**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-११**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-९/१२/२०११

प्रति,
मा. -----------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.११ मंगळवार दि.१३/१२/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**मंगळवार दिनांक-१३/१२/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६४ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणे. |
| ६५ | अहमदनगर महानगरपालिकेचे चितळे रोड येथील सिटी सर्व्हे नं. २०८ नेहरू मार्केट येथील एफ.बी.टी. प्रकल्प विकसीत करणेकामी विकासका कडून प्रतिसाद न मिळल्याने सदर प्रकल्प मनपा निधीतुन (इमारत बांधून त्या मधील गाळयांची विक्री करणे भाजी ओटे व मार्केट मधील पूर्वीचे भाडेकरू यांचे पुर्नःवसन करणे.) करणे किंवा सदर प्रकल्पाची प्रिमियम रक्कम कमी करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** १] विषय क्र.६४- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ६५ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ११**

विषय क्रमांक-६४ मंगळवार दिनांक १३/१२/२०११

ठराव क्रमांक-६४ मंगळवार दिनांक १३/१२/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक १५/११/२०११ व दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मागील सभा दिनांक १५/११/२०११ व दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा.स्थायी समिती सभा क्र.१० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ मंगळवार दिनांक १५/११/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १० सोमवार दिनांक २८/११/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ११**

विषय क्रमांक-६५ मंगळवार दिनांक १३/१२/२०११

ठराव क्रमांक-६५ मंगळवार दिनांक १३/१२/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे चितळे रोड येथील सिटी सर्व्हे नं. २०८ नेहरू मार्केट येथील एफ.बी.टी. प्रकल्प विकसीत करणेकामी विकासका कडून प्रतिसाद न मिळल्याने सदर प्रकल्प मनपा निधीतुन (इमारत बांधून त्या मधील गाळयांची विक्री करणे भाजी ओटे व मार्केट मधील पूर्वीचे भाडेकरू यांचे पुर्नःवसन करणे.) करणे किंवा सदर प्रकल्पाची प्रिमियम रक्कम कमी करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** नगररचना विभाग दिनांक २/९/२०११

विषय- सिटी सर्व्हे नंबर २०८ , नेहरू मार्केट , चितळे रोड येथील FBI प्रकल्पाचे फेर निविदा (तिसरी वेळ) मागविणे बाबत.

सादर,

वरील विषयान्वये अहवाल की, सिटी सर्व्हे नंबर २०८ या महानगरपालिका मालकीच्या जागेवर खाजगीकरणाच्या माध्यमातुन (FBI) दि.२५/१२/२०१० रोजी राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीर निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर प्रकल्पाबाबत नाशिक, औरंगाबाद , पुणे येथील विकासकानी विचारणा केली आहे. मात्र सदर निविदाची विक्रीसाठीची मुदत दि.२७/१/२०११ पर्यत होती. त्या कालावधी मध्ये मे. सुशिल कंन्स्ट्रक्शन, फुंदेवाडी, ता. निफाड , जि. नाशिक या एकच फर्मने निविदा खरेदी केलेली आहे. तसेच निविदा सादर करावयाची तारीख २९/१/२०११ होती. या कालावधी मध्ये एकही निविदा या कार्यालयाकडे दाखल झालेली नाही.

त्यानंतर सदर प्रकल्प विकसीत करण्याकरीता दिनांक २३/०२/२०११ रोजी फेरनिविदा काढण्यात आली परंतु एकही निविदा या कार्यालयाकडे दाखल झालेली नाही.

सबब सदर प्रकल्प विकसित करणेसाठी फेरनिविदा(तिसरी वेळ)ई टेडरिंग मार्फत काढणे आवश्यक आहे असे मत आहे.तरी सदर प्रकल्पाची निविदा फेर निविदा(तिसरी वेळ)ई टेडरिंग मार्फत काढणे बाबत वर्तमानपत्रात जाहिरात देणेबाबत येणा-या खर्चास मान्यता मिळणे विषयी विनंती आहे. **/ अ**

सोबत निविदेचा मसुदा मान्यतेसाठी सादर करीत आहे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) :- प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२/९/२०११

--**--

फेर सादर, दि.५/११/२०११

दि.२५/१२/२०१० , २३/०२/२०११ व ०३/०९/२०११ (E.Tendering) अशा तीन वेळा निविदा काढूनही नेहरू मार्केट या मनपा मालकीच्या जागेवरील F.B.T. च्या माध्यमातुन विकसित करावयाच्या प्रकल्पास विकासकाकडून प्रतिसाद मिळालेला नाही.

त्यामुळे मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेली प्रिमियमची रक्कम रूपये ४.५० कोटी + ५०.०० लाख (चितळे रोड विकसित करणे) ही जास्त होत आहे असे वाटते.

तरी सदरचा प्रकल्प विकसित करावयाचा झाल्यास त्यास खालील दोन पर्याय उपलब्ध होउ राहतात.

(१) मनपाच्या निधीमधुन सदरची इमारत बांधुन त्यामधील गाळयाची विक्री करणे, भाजी ओटे व मार्केट मधील पूर्वीचे भाडेकरू यांचे पुर्नःवसन करणे यासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे पुन्हा प्रस्ताव ठेवणे आवश्यक आहे./**अ**

(२) प्रिमियमची रक्कम जास्त होत असल्यामुळे कदाचित निविदेस प्रतिसाद लाभत नसल्यामुळे प्रिमियम रक्कम कमी करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती , मनपा ,अ.नगर यांचेसमोर ठेवणे आवश्यक आहे. /**अ**

वरिल पैकी दोन्ही प्रस्तावाबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) :- प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे F.B.T. तत्वावर नेहरू मार्केटच्या विकासासंदर्भातच पुर्नविचार करून निर्णय घेण्यास सदरील प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१५/११/२०११

मा. महापौर साहेब :- मा. सर्वसाधारण सभेने यापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार सदरची वास्तु एफ.बी.टी. (खाजगी करण) तत्वावर विकसीत करणे बाबत ठराव पारित झालेला आहे. सादर केलेल्या प्रस्तावातील मुद्दा क्र.१ मध्ये नगररचनाकार यांनी मनपा मार्फत की खाजगी करणातुन राबवावा असे दोनही मुद्दे प्रस्तावीत केले आहे. असे असले तरी आर्थिक दृष्टया मनपा मार्फत सदरचा प्रकल्प हाती घेणे जिकरीचे होईल. यास्तव F.B.T. तत्वानुसार प्रस्तावातील मुद्दा क्र.२ बाबत निर्णय घेणे कामी प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेत यावा. दि.३०/११/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केट येथील एफ.बी.टी. प्रकल्प विकसीत करणेकामी विकासकाकाडून प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्प मनपा निधीतुन करणे किंवा सदर प्रकल्पाचे प्रिमियमची रक्कम कमी करणेबाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- नगररचना विभाग इंजि. श्री. बल्लाळ के.वाय. यांनी माहिती सांगावी.

मा.उपायुक्त(सा.)डॉ.श्री.डोईफोडे साहेब :-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा व प्रस्तावाची माहिती सांगावी.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ. व मा.श्री. लोंढे सु.सो.:- सदर प्रकल्प मनपामार्फत करणे हिताचे नाही सदर प्रकल्पाची रक्कम कमी करावयाची झाल्यास स्थायीसमिती निर्णय घेउ शकेल का? प्रकल्प खाजगी करणातुन करणेसाठी प्रिमियम रक्कम कमी केल्यास प्रशासन मान्य करील का ?

मा.श्री. लोंढे सु.सो. :- महानगरपालिके मार्फत बांधकाम करणे ऐवजी पुर्वी झालेल्या महासभेच्या ठरावा अन्वये एफ.बी.टी. तत्वानुसार कार्यवाही केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल . तसेच मनपाच्या आर्थिक परिस्थिती विचारात घेता निधी उभारणेची आवश्यकता राहणार नाही. सदरच्या एफ.बी.टी. प्रकल्पाच्या रक्कम कशा आल्या प्रस्ताव कोणत्या विभागाने तयार केला आहे. त्यांनी माहिती सांगावी.

नगररचना विभाग इंजि.श्री. बल्लाळ के.वाय. :- मुळ प्रस्ताव नगर रचना विभागाकडून तयार करणेत आला असून प्रिमियम रक्कम अडीच कोटी ठरविली होती मा.आयुक्त साहेब यांनी संम्मती दिली होती.बांधकाम विभागाकडेस तो अभिप्रायासाठी पाठविला असता त्यांनीही प्रिमियमची रक्कम दिली आहे त्याचे रक्कमेनुसार मा.स्थायी समितीने प्रिमियम रक्कम ठरविली आहे.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- प्रशासनाचे प्रस्तावानुसारच स्थायी समितीने रक्कम ठरविली होती.

मा.उपायुक्त(सा.)डॉ.श्री.डोईफोडे साहेब:-नगररचना विभागाने रूपये अडीच कोटी व बांधकाम विभागानी रूपये साडेचार कोटी व चितळे रोड डांबरीकरणासाठी पन्नास लाख याप्रमाणे प्रिमियम रक्कमेबाबत दिलेल्या अभिप्रायानुसार स्थायीसमितीने प्रिमियमची रक्कम ठरविलेली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- नगर रचना विभाग व बांधकाम विभाग यांनी या रक्कमा कशा धरल्या ते सभेस सांगावे.

नगररचना विभाग इंजि.श्री. बल्लाळ के.वाय. :- नगर रचनाकार हे व्हॅल्युअर असतात त्यांनी रक्कम ठरविली आहे.

नगररचनाकार श्री. निकम सी.आर. :- संचालक नगररचना विभागामार्फत जमिनीचे किंमती बाबत प्राईज लिस्ट ठरविलेली असते त्यानुसार नगररचना विभागाने रक्कम ठरविली आहे.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- सदर प्रकल्पाची रक्कम हि कुठलीही कॅटेगरी लाउन ठरविलेली नाही प्रकल्पाची ११ गुंठे जागा आहे तेथील आसपासचे जागेचे बाजार दावा प्रमाणे रूपये पांच हजार चौरस फुट प्रमाणे जागेची किंमत रूपये पांच ते साडे पांच कोटी पर्यत येत होती. त्याप्रमाणे प्रकल्पाची प्रिमियमची अंदाजे रक्कमेची शिफारस केली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आम्ही कोणती रक्कम ठरवावी.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- मा.स्थायी समिती ठरविल त्याप्रमाणे निर्णय घेउ‍ शकते.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- दोनही प्रस्ताव सभेपुढे आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- प्रकल्प प्रिमियम रक्कम जास्त असल्यानेच रखडला आहे. प्रकल्प मार्गी लागणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आम्ही प्रस्ताव महासभेपुढे सादर केला होता मा. महापौर यांनी त्यांचे अधिकारात तो स्थायी समिती कडे पाठविला आहे. तो प्रशासनाकडेस पाठविला असता तर प्रशासनाने फेर प्रस्ताव तयार करून तो स्थायी समिती कडे पाठविला असता.

मा.श्री. डागवाले कि.आ. व मा.श्री. लोंढे सु.सो. :- मा. महापौर यांनी सदर प्रस्ताव नगरसचिव यांचेकडे पाठविला ते देखिल प्रशासकीय यंत्रणेतील आहेत.सदर प्रकल्पाचे नकाशामध्ये बदल करणेचे अधिकार ठेकेदार यांस आहेत का ?

नगररचना विभाग इंजि.श्री. बल्लाळ के.वाय.:- महासभेचे मंजूरी मध्ये ७० भाजी ओटे, पार्किंग व मे. कोर्टाचे आदेशानुसार नेहरू मार्केट मधील गाळे धारक यांचे पुर्नवसन हे कायम ठेउन बदल करू शकतो.

मा.श्री.भोसले ग.पुं.:-मा.आयुक्तसाहेब यांनी नगररचना विभागाने ठरविलेल्या रक्कमेस मान्यता दिलेली होती.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- आम्ही हया प्रकरणी निर्णय घेतला तर तो प्रशासन मान्य करील का ?

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- प्रशासनाचा निर्णय लेखी देउ मा.सभेने त्याप्रमाणे ठरवावे आम्ही फेर प्रस्ताव सादर करू

मा.श्री.लोंढे सु.सो.:- ठेकेदार नकाशा मध्ये बदल करू शकतो असा निर्णय घ्यावा प्रिमियम रक्कम ठरवावी.

मा.उपायुक्त (कर)सौ.झगडे मॅडमः- प्रस्ताव प्रशासनाकडेस परत पाठवावा प्रशासन फेर प्रस्ताव सादर करील.

मा.श्री.भोसले ग.पुं./मा.श्री. लोंढे सु.सो.:- महासभेने निर्णय घेतला त्याप्रमाणे कार्यवाही करणे असल्याने त्यास अधिन राहून प्रिमियम बाबत प्रशासनाचा अभिप्रायासह प्रस्ताव स्थायी समिती सभेकडेस सादर करणेत यावा याप्रमाणे ठरवावे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडेस प्रिमियम रक्कम ठरवून फेरसादर करणेकरिता परत पाठवावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे नेहरू मार्केट येथील एफ.बी.टी. प्रकल्प विकसीत करणेकामी मा.महासभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे एफ.बी.टी. प्रस्ताव फेरसादर करणेकरिता प्रशासनाकडेस परत पाठविणेत यावा प्रशासनाने लवकरात लवकर सदर प्रकल्पाचे प्रिमियम रक्कमेसह स्वयंस्पष्ट अहवालासह प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे चितळेरोड येथील सिटी सर्व्हे नं.२०८ नेहरू मार्केट या जागेत भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारणेचे काम एफ.बी.टी. तत्वावर विकसीत करण्याबाबत मा.महासभा ठराव क्र.२१ दिनांक १०/८/२००९ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर प्रकल्प एफ.बी.टी.तत्वावर विकसीत करणेच्या दृष्टीने विचार करता ही सभा सादर केलेल्या प्रस्तावामध्ये प्रिमियम रकमेबाबत विसंगती दिसुन येत असल्याने याप्रकरणी स्वंयस्पष्ट अहवाल सादर करणे अपेक्षित आहे जेणे करून पुढील योग्य ती कार्यवाही करणे सभेस सुलभ होईल.तरी लवकरात लवकर अहवाल फेरसादर करावा.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका